# पहिला भारतीय महिला डॉक्टर- आनंदीबाई गोपाळराव जोशी.

**सानिका अनिल हंडे.**
ए. आर.पी.कन्या महाविद्यालय,
इचलकरंजी

**प्रस्तावना -**

आनंदीबाई जोशी यांच्या बदल माहिती मराठी आनंदीबाई जोशी, म्हणतात ना मूर्ती लहान पण कीर्ती महान असंच काहीतरी आनंदीबाई जोशी यांच्या आयुष्यात घडल आनंदीबाई जोशी. आनंदीबाई यांची ओळख भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर म्हणून आहे. यांची ख्याती सर्व विश्वमध्ये प्रसिद्ध आहे आनंदी आणि गोपाल हे एक यशस्वी दांपत्य होते.आनंदीबाई जोशी यांनी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी तसेच अनेक अडचणी यांना कसे सामोरे गेले त्यांचा आढावा घेऊया.

**जीवन -**

आनंदीबाई जोशी यांचा जन्म 31 मार्च 1865 रोजी पुण्यात त्यांच्या आजोळी झाला यांचे पूर्वाश्रमीचे नाव यगुना होते जुन्या कल्याण परिसरातील पारनाका येथे राहणाऱ्या, गणपतराव अमृतेश्वर जोशी यांच्या ज्येष्ठ कन्या होत्या. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह वयाने त्यांच्या हुन 20 वर्षांनी मोठे असणाऱ्या गोपाळराव जोशी याच्याशी झाला. वयाच्या चौदाव्या वर्षी आनंदीबाईनी एका मुलाला जन्म दिला परंतु वैदयकीय उपचार न मिळावल्यामुळे मूल फक्त दहा दिवस जगले. आनंदीबाईच्या जीवनात हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या घटनेनंतर त्यांनी डॉक्टर होण्याचे ठरविले. गोपाळरावांनी तिला मिशनरी शाळांमध्ये प्रवेश मिळावा म्हणुन प्रयत्न केला जोशी यांनी कलकत्याला बदली घेतल्यावर तेथे आनंदी बाई संस्कृत आणि इंग्लिश वाचणे आणि बोलणे शिकल्या गोपाळराव कल्याणला पोस्ट ऑफिसात कारकुन होते नंतर त्यांची अलिबाग येथे आणि त्या काळातही त्यांचा महिला शिक्षणाला पाठिंबा होते कारण पत्नीने वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर बनावे, असा त्यांचा आग्रह ते स्वत: लोकहितवादींची शतपत्रे वाचत आणि आपल्या पत्नीस इंग्रजी शिकविण्याचे ठरविले.

**वैद्यकीय-**

आनंदीबाईच्या वैदयकीय शिक्षणाच्या बाबतीत गोपाळरावांनी अमेरिकेत काही पत्रव्यवहार केला.परंतु हे शिक्षण घेण्यासाठी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यातची अट होती आनंदीबाई ख्रिस्ती धर्म न स्वीकारता 1883 मध्ये वयाच्या एकोणिसाव्या वर्षी विमेन्स मेडिकल कॉलेज ऑफ पेन्सिल्व्हेनिया मध्ये प्रवेश मिळाला तेथे गेल्यानंतर अमेरिकेतील नविन वातावरण आणि प्रवासातील दगदग यामुळे आनंदीबाईची प्रकृती खुप ढासळली होतो, परंतु अमेरिकेतील कारपेंटर जोडप्याचे साहाय्य त्यांना लाभले.

वैदयकीय शिक्षण आनंदीबाईच्या वैदयकीय शिक्षणाच्या बाबतीत गोपाळरावांनी अमेरिकन काही पत्रव्यवहार केला परंतु हे शिक्षण घेण्यासाठी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यात ची अट होती आनंदीबाई ख्रिस्ती धर्म न स्वीकारता 1883 मध्ये वयाच्या एकोणिसाव्या वर्षी विमेन्स मेडिकल कॉलेज ऑफ पेन्सिल्व्हेनिया मध्ये प्रवेश मिळाला नेये गेल्यानंतर अमेरिकेतील नविन वातावरण आणि प्रवासातील दगदग यामुळे आनंदीबाईची प्रकृती खुप दासलली होतो, परंतु अमेरिकेतील कारपेंटर जोडप्याचे साहाय्य त्यांना लाभले.

सुरुवातीला तत्कालीन भारतीय समाज कडुन आनंदीबाईच्या डॉक्टर होण्याला खूप विरोध झाला.त्यावेळी आनंदीबाईनी कोलकाता येथे एक भाषण केले भारता मध्ये महिला डॉक्टरची किती आवश्यक आहे यांचे प्रतिपादन केले.मला यासाठी धर्मांतर करण्याची काही गरज नाही.मी माझा हिंदू धर्म व संस्कृती यांचा कदापि त्याग करणार नाही.मला माझे शिक्षण पूर्ण झाल्या भारतात येऊन महिलांसाठी एक वैद्यकीय महाविदयालय सुरु करायचे आहे.

आनंदीबाईचे हे भाषण लोकांना खूप आवडले. त्यामुळे त्यांना होणार विरोध तर कमी झालाच पण त्यांना या कार्यात हातभार म्हणून सबंध भारतातून आर्थिक मदत जमा झाली. भारताचे तत्काली व्हाइसरॉय त्यांना पण 200 रु फंड जाहीर केला. कष्टाच्या आणि जिदीच्या जोरावर अभ्यासक्रम दोन वर्षांत पूर्ण करून मार्च इ.स.1886 मध्ये आनंदीबाई एम.डी ची पदवी मिळवली. एम. डी साठी त्यांनी "हिंदू आर्य लोकांमधील प्रसूतिशास्त्र" या विषयावर प्रबंध लिहिला एम डी झाल्यावर व्हिक्टोरिया राण कडून त्यांचे अभिनंदन झाले. हा प्रवास करताना यांना गोपाळरावांचा पाठिंबा होता. तिच्या पदवीदान समारंभाला गोपालराव स्वत: अमेरिकन गेले होते, एम डी झाल्यावर आनंदीबाई जेव्हा भारतात आल्यावर त्यांना कोल्हापूरमधील अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल मधील स्त्री कक्षाचा ताबा देण्यात आला.

**मृत्यू-**

` वयाच्या विशीतच त्यांना क्षयरोग झाला होता. पुढे काही महिन्यातच म्हणजे 26 फेब्रुवारी इ. स 1887 रोजी त्यांना पुण्यात मृत्यू आला.

केवल 21 वर्षांच्या जीवन यात्रेत आनंदीबाईनी भारतीय स्त्रियांसाठी प्रेरणादायी जीवनादर्श उभा केला. दुर्दैवाने आनंदीबाई बुद्धिमतेचा आणि ज्ञानाचा फायदा जनतेला होऊ शकला नाही.मात्र'चुल आणि मुल म्हणजेच आयुष्य असे समजणाऱ्या महिलांना त्या काळात आनंदीबाई जोशी त्यांनी आदर्श व मान दंड घालून दिला. एकीकडे सावित्रीबाई व ज्योतिबा फुले स्त्री शिक्षणासाठी प्रत्यत्न करत असतानाच आनंदी गोपाल हे जोडपे आपले ध्येय प्राप्त कण्यासाठी झटत होते. स्व:त डॉक्टर होऊनही कुणी देश भगिनीवर उपचार करण्याची संधी आनंदबाईनी मिळालीच नाही, तिकडे अमेरिकेत मात्र कारपेंटर यांनी आपल्या कुटुंबाच्या स्मशानात त्याचे लहान से थडगे बांधले. त्यावर 'आनंदी जोशी, एक तरुण हिंदू ब्राम्हणकन्या. परदेशात शिक्षण घेऊन डॉक्टर पटवी मिळवणारी पहिली भारतीय स्त्री' अशी अक्षरे कोरून तिचे स्मारक केले.

**लोकप्रिय संस्कृतीतील चित्रणे -**

आनंदी यांच्या जीवनाचा आढावा होणारा "आनंदी गोपाळा "हा मराठी चित्रपट फ्रेबवारी 2019 मध्ये प्रदर्शित झाला दिग्दर्शक समीर विदांस. या चित्रपटाला पुणे फिल्म फाऊंडेशन आणि राज्य सरकार यांच्यातर्फे जानेवारी 2020 मध्ये, आभोजित केलेल्या 18 व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी मराठी विभागात पहिला पुरस्कार मिळाला

**आनंदीबाई बदलची पुस्तके -**

1.कै .सौ.डॉ आनंदीबाई जोगी यांचे चरित्र काशीबाई 'कानिटकर

2.आनंदी गोपाल - श्री ज जोशी यांनी लिहिलेली कादंबरी

3. डॉ आनंदीबाई जोशी :काळ आणि कृर्तृत्व (अंजली कीर्तने)

4.आनंदी गोपाळ (मराठा नाटक, लेखक राम जोगळेकर)

**संदर्भ :-**

**1.** वॉल्श, ज्युडिंथ ई. (2004) औपनिवेशिक भारतातील पुस्तके 'घरगुतीता' पुरुषानी सल्ला दिल्यावर महिलांनी काय शिकले शेवमन गाणि लिटलफिल्ड पब्लिशर्स.

2. (a) Dalta, Amaresh (1987). Encyclopedia of Indian Literature :A - Deve (इंग्रजी भाषेत) Saud Akademi

3. कोसंबी, एम., रामास्वामी आर, कोल्हटकर, एम आणि मुखर्जी, ए. 2019 अ फ्रगमेटेड फेमिनिझम आनंदीबाई जोशीचे जीवन आणि पत्रे रूटलेज इंडिया.

4) कोसंबी, एम, मॉर्डर, ॲलिस ; कृष्णा राज मैत्रेथी (200) आदर्श प्रतिमा आणि वास्तविक जीवन साहित्य आणि इतिहासातील पहिला

5) अप्रकाशित साधनांतून दिसणारे आनंदी गोपाळ,

पुणे : डॉ चि. ना परचुरे 28 August 1997 p. p. 407.

6) कुमार राधा (1997) द हिस्ट्री ऑफ डूइंग: एन इलस्ट्रेटेट अकाऊंट ऑफ मूव्हमेंट्स फॉर वुमेन्स राइट्स अँड फेमिनिसम इन इंडिया 1800-1990.
7) कबर -यार्ड.
8) परब, भक्ती (10.2 .2019) "आनंदी गोपाल एका स्वप्नपूर्तीची गोष्ट.

७) थार्नर, ॲलिस, राज मैत्रेयी कृष्णा (2000), आदर्श, प्रतिमा आणि वास्तविक जीवन: साहित्य आणि इतिहासातील महिला.

10) जोशी, श्री कृष्ण जनार्दन (1992) आनंदी गोपाल (इंग्रजीत) भटकळ आणि मुलगा

11) कीर्तने, अञ्जली (2015) डॉक्टर आनंदीबाई जोशी काळ आणि कर्तृत्व
12) स्त्री सागरातील अनमोल मोती, कवि माघवी पान नं **33**
Internet source:
13) https://mr.m.wikipedia org.